MHBI080007572023

नि.दि.दा.क्र. २००/२०२३ मधील निशाणी क्र. १७ खालील आदेश

प्रतिवादीने सदरचा अर्ज त्याच्याविरुध्द झालेला एकतर्फा आदेश रद्द करुन मिळण्यासाठी व त्याने दाखल केलेले म्हणणे व कैफियत स्विकारण्यासाठी केलेला आहे. प्रतिवादीने सदरच्या अर्जात कथन केले आहे की, ता. ०२.०५.२०२३ पासून प्रतिवादीच्या कार्यालयाने अतिक्रमण हटविण्याची कारवाई सुरु केली होती. सदरचे कामामुळे प्रतिवादी हा सदरच्या दाव्यात समन्स बजावल्यानंतर लगेच हजर होऊ शकला नाही. त्याने जाणीवपूर्वक न्यायालयात हजर राहण्यासाठी टाळाटाळ केली नाही. तो सदरचे दाव्यात हजर न झाल्यामुळे त्याच्याविरुध्द एकतर्फा चौकशीचा आदेश पारीत झालेला आहे. सदरचे प्रकरणात अतिक्रमणाच्या कारवाईबाबत खोटे आरोप करण्यात आले आहेत. त्यामुळे सदरचे प्रकरणात प्रतिवादीचे म्हणणे ऐकूण घेणे आवश्यक आहे. प्रतिवादी हा सदरचे अर्जासोबत कैफियत दाखल करीत आहे. त्यामुळे त्याच्या विरुध्द झालेला एकतर्फा आदेश रद्द करुन सदरची कैफियत दाखल करुन घेणेत यावी असे त्याने म्हटले आहे. म्हणून त्याने त्याचा अर्ज मंजूर करण्याची विनंती केली आहे.

२. सदरचे अर्जास वादीने जबाब दिलेला असून त्यामध्ये प्रतिवादीच्या अर्जातील सर्व कथन नाकारले आहे. त्याने पुढे कथन केले आहे की, प्रतिवादीने खुप विलंबाने त्याचे म्हणणे व कैफियत दाखल केली आहे व त्याकामी संयुक्तीक कारण दिलेले नाही. त्यामुळे सदरचा अर्ज कायदेशीर नाही व त्यामुळे तो रद्द होण्यास पात्र आहे असे त्याने म्हटले आहे.

३. वर नमूद केलेल्या कथनांचा विचार करुन माझे विचारार्थ खालील मुद्दे आहेत व त्या मुद्दयावर मी माझे कारणांसह निष्कर्ष नोंदवित आहे.

मुद्दे	निष्कर्ष
१. एकतर्फा आदेश रद्द करणे व कैफीयत दाखल करण्यास परवानगी देणे आवश्यक आहे काय ?	..... होय
२. आदेश काय ?	.... अंतिम आदेशाप्रमाणे

कारणमिमांसा

मुद्दा क्र. १ बाबत

४. मी प्रतिवादीतर्फे विद्वान वकील श्री. डक व वादीतर्फे विद्वान वकील श्री. सय्यद यांचा युक्तिवाद ऐकला. तसेच सदरच्या प्रकरणांमधील संबंधीत दस्तऐवज पाहिले. प्रतिवादीला ता. १२.०५.२०२३ रोजी समन्सची बजावणी झाल्याचे दिसुन येते. परंतु प्रतिवादी हा नेमुन दिलेल्या तारखेस हजर न राहिल्यामुळे न्यायालयाने त्याच्याविरुद्ध त्याचदिवशी एकतर्फा आदेश पारीत केला आहे. त्यानंतर ता. २९.०५.२०२३ रोजी प्रतिवादीने सदरचा अर्ज दिलेला आहे व अर्जासोबत त्याची कैफियत दिलेली आहे. सदरचे दाव्याचे कायमचे निराकरन करण्यासाठी व प्रतिवादीला त्याची बाजू मांडणेसाठी संधी देणेसाठी त्याच्या विरुध्द झालेला एकतर्फा आदेश रद्द होणे न्यायाच्या हितार्थ आवश्यक आहे. प्रतिवादीला जर सदरची संधी देण्यात आली नाही तर त्याला न्याय नाकारलेसारखे होईल. तसेच दोन्ही पक्षकारांचा पूर्ण पुरावा न्यायालयासमोर आला तर न्यायालयाला योग्य न्यायनिवाडा करणे सोयीचे होईल. त्यामुळे प्रतिवादीविरुध्द झालेला एकतर्फा आदेश रद्द करणे व कैफीयत दाखल

करण्यास परवानगी देणे आवश्यक आहे. म्हणून मी मुद्दा क्र. १ चे उत्तर होकारार्थी नोंदवित आहे.

मुद्दा क्र. २ बाबत

५. मी वर नमुद केल्याप्रमाणे सदरचा अर्ज मंजूर करणे आवश्यक आहे. परंतु, प्रतिवादी हा त्याच्याविरूद्ध एकतर्फा आदेश पारीत झाल्यानंतर दोन तारखा झाल्यानंतर सदरच्या प्रकरणात हजर झाला आहे. त्यामुळे वादीला त्रास सहन करावा लागला आहे. त्यामुळे त्याबाबत वादीला खर्चाची रक्कम देणे आवश्यक आहे. म्हणुन मी मुद्दा क्र. २ चे उत्तरासाठी खालील अंतिम आदेश पारीत करीत आहे.

आदेश

सदरचा निशाणी क्र. १७ चा अर्ज प्रतिवादीने वादीला खर्चाची रक्कम रु. २००/– देण्याचे अटीवर मंजूर करण्यात येत आहे.

DISTRICT COURTS MAHARASHTRA
सत्यमेव जयते

Digitally signed by SOPAN D GHANWAT
Date: 2023.05.29 17:14:49 +0530

दिनांक : २९/०५/२०२३

(सो. द. घनवट)
दिवाणी न्यायाधीश वरीष्ठ स्तर,
माजलगाव.

शेरा

मी शपथेवर सांगतो की, या पी.डी.एफ. आदेश फाईल मधील मजकूर हा मूळ आदेशातील मजकूराशी शब्द न शब्द सारखा आहे.

लघुलेखकाचे नाव	–	श्री. हनुमंत बळवंतराव सूर्यवंशी
कोर्टाचे नाव	–	दि. न्या. व. स्तर, माजलगाव
न्यायनिर्णयाचा मजकूर सांगितल्याचा दिनांक	–	२९/०५/२०२३
न्यायनिर्णय टंकलिखित केलेला दिनांक	–	२९/०५/२०२३
न्यायनिर्णय स्वाक्षरीत केल्याचा दिनांक	–	२९/०५/२०२३
न्यायनिर्णय अपलोड केल्याचा दिनांक	–	२९/०५/२०२३

स्वाक्षरीत/–

दिनांक – २९/०५/२०२३

(ह. ब. सूर्यवंशी)
लघुलेखक ग्रेड – २,
दिवाणी न्यायालय, व. स्तर, माजलगाव